# समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहमदनगर

## बांधकाम

**उद्देश :**

१. तालुक्याच्या ठिकाणी गट साधन केंद्राचे व केंद्राच्या ठिकाणी समूह साधन केंद्राचे बांधकाम करणे
२. गरजेनुसार वर्गखोल्यांचे बांधकाम ग्रामशिक्षण समिती मार्फत पूर्ण करणे
३. मोडकळीस आलेल्या व दुरुस्ती पलीकडे गेलेल्या शाळागृहाचे जागी नवीन शाळांचे इमारत बांधकाम
४. नवीन शाळा उघडल्याचे ठिकाणी नवीन शाळा इमारतीचे बांधकाम करणे
५. शाळेला इमारत नसल्यास नवीन शाळागृहांचे बांधकाम
६. शाळेचा परिसर आकर्षक आणि आनंददायी बनविण्याच्या दृष्टिने वर्गखोल्यांची आयताकृती आकारात बांधणी करणे
७. गरजेनुसार संरक्षक भिंतीचे बांधकाम
८. सर्व बांधकामाची गुणवत्ता व टिकाऊपणासाठी स्थानिक समाजाचा सहभाग घेणे
९. स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी व विद्युत इ. सोयी करणे

**शाळाखोली बांधकामातील घटक :**

१. शाळा खोलीमध्ये मुलांना बसवण्यासाठी भिंतीलगत (फळयाच्या भिंती व्यतिरिक्त) बाकडयांचे बांधकाम
२. विद्यार्थ्यांसाठी खडू-फळा
३. जमिनीवर भौमितिक आकृत्या
४. शैक्षणिक कोपरे
५. भिंतीमधील कपाट
६. भिंतीवरील प्रदर्शनीय फलक लावण्याकरीता हुक असलेल्या लाकडी पटटया
७. दुरदर्शन संच ठेवण्यासाठी कडप्पा

**बाहयघटक :**

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प, मैदान, ॲम्पीथिएटर, घसरगुंडी, वाळूचे मैदान, शाळेच्या आवारातील वर्गाबाहेरचा खडू-फळा, शाळेच्या आवारात झाडे असल्यास झाडांभोवती चबुतऱ्याचे बांधकाम.

बांधकामाचे प्रामुख्याने खालील प्रकारांचा अंतर्भाव आहे.

१. गट साधन केंद्र
२. समूह साधन केंद्र
३. नविन प्राथमिक शाळा खोल्या
४. नविन उच्च प्राथमिक शाळा खोल्या
५. इमारत विरहीत प्राथमिक शाळा खोल्या
६. इमारत विरहीत उच्च प्राथमिक शाळा खोल्या
७. मोडकळीस प्राथमिक शाळा खोल्या

८. मोडकळीस उच्च प्राथमिक शाळा खोल्या
९. अतिरिक्त शाळा खोल्या
१०. स्वच्छतागृह
११. पाणी पुरवठा
१२. विद्युतीकरण
१३. संरक्षक भिंत

## बांधकाम कार्यपध्दती

**१) प्रशासकीय मान्यता :**

समग्र शिक्षा अंतर्गत शाळास्तरावरुन यु-डायस प्लस या ऑनलाईन प्रणालीमध्ये बांधकामाची आवश्यकता असणाऱ्या शाळा खोल्यांची मागणी ऑनलाईन पध्दतीने नोंदविली जाते. सदर प्राप्त माहितीच्या आधारे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडून आवश्यकता असणाऱ्या शाळा खोल्यांची यु-डायस प्लस क्रमांक व नावानिशी प्रशासकीय मान्यता दिली जाते.

**२) तांत्रिक मान्यता :**

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडून प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर मान्यता प्राप्त शाळा खोल्यांचे अंदाजपत्रक तयार केले जाते. सदर अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, समग्र शिक्षा यांचेकडून तांत्रिक मान्यता दिली जाते.

**३) करारनामे :**

उपरोक्त बाबींची पूर्तता झाल्यानंतर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेवतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अथवा आयुक्त / मुख्याधिकारी (महानगरपालिका / नगरपालिका) किंवा त्यांचा प्रतिनिधी, गटशिक्षणाधिकारी / ग्रामशिक्षण समिती यांच्यामध्ये बांधकामाचा करारनामा साक्षीदारांच्या उपस्थितीत व स्वाक्षरीने केला जातो.

**४) अग्रीम वितरण :**

करारनामा झाल्यानंतर खालीलप्रकारे निधींचे वितरण केले जाते.

| हप्ता | केव्हा दयावयाचा | किती दयावयाचा |
|---|---|---|
| पहिला | करार नाम्यावर सहया झाल्यावर | निव्वळ बांधकाम रकमेच्या ५० टक्के |
| दुसरा | बांधकामाचे छत टाकून झाल्यानंतर | निव्वळ बांधकाम रकमेच्या ४५ टक्के |
| अंतिम | बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व अग्रीम समायोजनांचे प्रस्ताव दिल्यानंतर | निव्वळ बांधकाम रकमेच्या ५ टक्के |

बांधकामावर तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी कनिष्ठ अभियंता (समग्र) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.